* con मार्च 2020

Impact Factor – SJIF 6.293

ISSN-2349-638x

# Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

## Smt. Savitabai Uttamrao Deshmukh Mahavidyalay, Digras

Organize

## One Day Interdisciplinary National Level Conference

on

## Emerging Trends in Higher education: Arts and Humanities

**Editor**

Dr. Dipak Ulemale

**Chief Editor**

Pramod P. Tandale

# जगतीकीकरणाचा आदिवासी संस्कृतिवर पडलेला प्रभाव

**सहा. प्रा. आनंद गो. मनवर**
समाजशास्त्र विभाग
युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय,अमरावती

**प्रस्तावना :**

जागतीकीकरण हि एक बहुआयामी प्रक्रीया आहे जि २० व्या शतकाच्या अखेरच्या कालखंडात विकसीत झाली आणि जागतीक अर्थव्यवस्था निर्मान करण्यासाठी जगातील सर्व देशांनी आपल्या देशाच्या भौगोलीक सिमांचा विचार न करता जागतीक पातळीवर सर्व आर्थिक व्यवहार करुन सर्व देशाची एकत्र बाजारपेठ म्हणजे जागतीक बाजारपेठ निर्माण करणे याला जागतीकीकरण म्हणतात.

सि.टी कुरीन यांच्या मते ''विविधता असलेल्या अर्थव्यवस्थेचा समुह म्हणजे जागतीक अर्थव्यवस्था होय''.

जागतीकीकरन वस्तु व सेवा .भांडवल मानवी संसाधने यांच्या गतीशीलतेवर कोणतेही भौगोलीक बंधने अथवा नियंत्रने नसतात. संगनक क्रांतीमुळे जग हे अधिकच जवळ आले आहे. जागतीकीकरणाचा प्रभाव शहरी, ग्रामीन व आदिवासी समाजामधे जागतीकीकरनाचा प्रभाव सकारात्मक आणि नकारात्मक पडलेला दिसुन येतो. जागतीकीकरणाच्या प्रक्रीयेमध्ये कोणतेही व्यक्ती स्वतंत्र अथवा विभक्त समुदायाचा भाग नसतो. संपुर्ण समाजच जागतीक व्यवहाराशी जोडला गेलेला असतो .या संपुर्ण प्रक्रीयेतुन सामाजीकरनाचा सांस्कृतीक आणि सामाजीक जिवनावर परिणाम झालेला दिसतो. कुटुंब व्यवस्था, विवाह, स्त्री पुरुष संबंध, जाती, जनजाती, भाषा इत्यादी सामाजीक घटकावर मोठा प्रभाव पडत आहे. लहान मुले, तरुन वर्ग आणि वृध्दांच्या जिवनमात्र प्रभावित झालेले आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे लोकांच्या जिवनाचा सांस्कृतीक आकृतीबंध बदलला आहे. त्यामध्ये खानपान. पेहराव. भाषा. संगीत. एकुनच जिवनपध्दतीत बदल दिसुन येत आहे. याचाच अर्थ त्या ठिकाणी असलेल्या त्यांच्या सांस्कृतीक जिवनात बदल घडुन येत आहे. ओघाच्या दृष्टीने ते करणे क्रमप्राप्त ठरते मग तो समुदाय विकसीत असो की अविकसीत असो त्याचा परिणाम अनुकुल असो की प्रतिकुल असा त्या ठिकानी अस्तीत्वात असलेल्या व्यवस्थेच्या माध्यमातुन कराराच्या रुपाने त्या समुदायात रुजविण्याचा प्रयत्न केला जातो. गेल्या तिस वर्षाच्या कालखंडात जागतीकीकरनाचा आदिवासी संस्कृतीवर अनुकुल व प्रतिकुल प्रभाव पडला आहे. त्यांच्या अध्ययना करीता विषयाची निवड करण्यात आली.

**जागतीकीकरणाची संकल्पना :**

जागतीकीकरन म्हणजे जागतीक अर्थव्यवस्था अस्तीत्वात आणल्या जाणारी सर्व राष्ट्राची एकच बाजारपेठ निर्माण करणे होय. आंतरराष्ट्रीय नाने निधीच्या व्याख्येनुसार '' जागतीकीकरण म्हणजे वस्तु सेवा आंतरराष्टीय भांडवल, प्रवाह, अती जलद व प्रसरन पावनारे तंत्रज्ञान याचे वाढते प्रमान तसेच विविधता यांच्या सहायाने जागतीक देशाने सतत वाढत जानारे परस्परावलंबीत्व होय''.

**संस्कृती संकल्पना :**

संस्कृती हि व्यापक स्वरूपाचा अर्थ असनारी संज्ञा आहे. म्हणुन संस्कृतीची निश्चीत शब्दात व्याख्या करणे अवघड काम आहे. सर्वसाधारण शब्दात ''मानवी जीवन जगण्याची पध्दती म्हणजे संस्कृती होय'' अशी व्याख्या विचारवंतानी केली आहे. मनुष्य जिवन जगत असतांना त्या ठिकानच्या

वातावरनानुसार आपली जिवन पध्दती विकसीत करीत असतो. जंगलाचा किंवा डोंगर दऱ्यात राहणाऱ्या आदिवासी जमातीचे उद्‌दीष्ट साध्य करण्यासाठी त्यांनी विविध पध्दती निर्मान केल्या. त्याला संस्कृती असे म्हणतात. हायकर यांच्या मते ''समाजाचा घटक म्हणुन व्यक्ती जे ज्ञान, श्रध्दा, कला, नितीतत्वे, कायदे, रूढी, आणि इतर बाबी प्राप्त करुन घेते त्या सर्वाच्या समीश्र एकत्रीकरणास संस्कृती असे म्हणतात''.

**उद्‌दीष्ट :**

१. जगतीकीकरनाच्या प्रक्रीयेचा अभ्यास करणे.

२. जगतीकीकरनाचा आदिवासी संस्कृतीवरील प्रभावाचे अध्ययन करणे.

**अध्ययन पध्दती :**

जागतीकीकरनाचा आदिवासी संस्कृतीवर पडलेल्या प्रभावाचे अध्ययन करण्या करिता ऐतीहासीक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला असुन त्या करिता वृत्तपत्रे, मासिके, संदर्भ ग्रंथ इत्यादी साधानाचा वापर करण्यात आला आहे.

**आदिवासी संस्कृतीवर जागतीकीकरनाचा पडलेला प्रभाव:**

जागतीकीकरन ही बहुआयामी संकल्पना असुन त्याचा प्रभाव जगातील प्रत्येक देशातील नागरी,ग्रामीन व आदिवासी संस्कृतीवर पडलेला दिसतो जागतीकीकरणाचे काही अनुकुल तर काही प्रतिकुल परिणाम संस्कृतीवर पडलेले आपनास दिसतील.

**१. प्रथा, परंपरा व मुल्य :**

आदिवासी संस्कृतीमध्ये प्रथा परंपरा व धार्मीक मुल्यता अनन्य साधारण महत्व होते. जिवन जगत असतांना धार्मीक मुल्य जोपासली जात असुन पुजा अर्चा उपास, नवस, या धार्मीक क्रियांच्या माध्यमातुन आपली कामे साध्य करण्याचा प्रयत्न करित होते. परंतु जागतीकीकरनामुळे प्रथापरंपरा व धार्मीक मुल्यांचे प्राबल्य कमी होतांना दिसत आहे.

**२. लोककला :**

जंगलात किंवा डोंगर दऱ्यात राहणाऱ्या आदिवासी समुहाचा उद्‌देश सामुहीक जिवन जगने हा आहे. लोकनृत्य, लोककलेच्या माध्यमातुन समुहातील सर्व एकत्र येवुन उत्सव साजरा करतात त्यामुळे त्यांच्यात सामुदायीक भावना वृध्दींगत होते. परंतु आजच्या काळामध्ये टि.व्ही, सिनेमा, मोबाईल वापरामुळे वंश परंपरागत असलेल्या कला ऱ्हास पावत आहे.

**३. कुटुंब पध्दती :**

डोंगराळ व घनदाट जंगलात राहणाऱ्या आदिवासी लोकांचा बाहय जगाशी संपर्क नव्हता त्यांची विशीष्ट प्रकारची बोली भाषा व पोषाख पध्दती होती. त्यांच्या गरज सुध्दा जंगलामधुन उत्पादीत होणाऱ्या नैसर्गीक साधन संपत्तीवर भागवील्या जात होत्या. आदिवासी जंगलाचे राजे संबोधल्या जात असत. जंगलावर त्यांचा मालकी हक्क होता परंतु जागतीकीकरनामुळे बाहयजगाशी संपर्क आला. ख्रिश्चन मिशनरी, सरकारी नौकर, कारखानदार, शासनाचे नवीन धोरन यामुळे त्यांच्या जगण्यावर मर्यादा येत आहे. धर्म परिवर्तन, वेशभुषा, केशभुषा, जीवनजगण्याची पध्दतीवर प्रभाव पडल्यामुळे ते आपल्या मुळे समुदायातील लोकांपासुन तुटल्या गेले. पारंपारीक व आधुनिक असा संघर्ष त्यांच्यात निर्मान होताना दिसत आहे.

**४. विवाह पध्दती :**

आदिवासी समाजामध्ये विवाहाचे अनेक प्रकार सांगीतले आहे व त्या नुसार विवाह जुळविला जात असे. किंवा युवागृहाच्या माध्यमातुन गावातील तरुन तरुनी काही दिवस एकत्र राहुन दोघांचे

विचार व समाजाची मान्यता असल्यास विवाह लावुन दिल्या जात असे परंतु जागतीकीकरनामुळे विवाह संस्थेत मोठया प्रमाणात परिवर्तन झालेले आहे. प्रेमविवाहाचे प्रमान आज वाढत आहे. मुले मुली पळुन जावून लग्न करतात त्यामुळे घटस्फोटाचे प्रमान वाढतांना दिसते, विवाहाचे वय, हुंडा पध्दती,भेट वस्तु घेण्याचे प्रमान वाढत आहे एकंदरीत विवाह संस्थेवर जागतीकीकरनाचा प्रभाव दिसुन येतो.

## निष्कर्ष :

१. जागतीकीकरनामुळे व तंत्रज्ञानामुळे जग जवळ आले आहे.
२. जागतीकीकरनामुळे आदिवासी संस्कृतीचा ऱ्हास होत आहे.
३. जागतीकीकरनामुळे. सामाजीक संस्थेमध्ये परिवर्तन झाले.
४. जागतीकीकरनामुळे सकारात्मकतेपेक्षा नकारात्मक प्रभाव जास्त पडलेला दिसतो.

## संदर्भ सुची लेखक, पुस्तक प्रकाशन

१. डॉ. ढमढेरे एम. डी, डॉ. तुपे संजय, भारतीय आणि जागतीक आर्थिक विकास. डायमंड पब्लीकेशन, पुणे.
२. खंड सि.प. आर्थीक सुधारनाचे नववर्ष, दिपराज प्रकाशन, पुणे.
३. भागवत ॲडमीरल विष्णु, जागतीकीकरन नवीन गुलाम गीरी समता प्रकाशन नागपुर
४. भोगाडे विलास, जागतीकीकरन आणि जाती निर्मुलन, अशोक प्रकाशन, नागपुर
५. कांबळे उत्तम, जागतीकीकरनात मराठी कविता, परचुरे प्रकाशन, मुंबई
६. लोटे. रा. ज. डॉ. चौहान ए.डी सामाजीक मानवशास्त्र पिंपळापुरे ॲन्ड पब्लिशर्स, नागपुर
७. लोटे रा.ज. डॉ. चौहान ए.डी समाजशास्त्र परिचय/ पिंपळापुरे ॲन्ड पब्लिशर्स, नागपुर
८. डॉ. बोबडे/ लोटे, सामाजीक मानवशास्त्र पिंपळापुरे ॲन्ड पब्लिशर्स, नागपुर
९. प्रा. कराडे जागतीकीकरन भारतासमोरील आव्हाने, डायमंड प्रकाशन, पुणे

Shree Durgamata Bahu-uddeshiya [illegible] Chincholi No2 Digras Established

# Smt. Savitabai Uttamrao Deshmukh Mahavidyalay Digras,

*Dist. Yavatmal*

**Interdisciplinary National Conference on**

## Emerging Trends in Higher Education, Social Science and Humanities

## Certificate

This is to certify that Prof. Dr. /Mr. /Ms. प्रा. आनंद गो. मनवर

of सुवाशवती कला व विज्ञान महा. अमरावती has actively participated in the Conference [illegible] has presented a research paper in the subject समाजशास्त्र [illegible] जागतिकीकरणाचा आदिवासी संस्कृतिवर पडलेला प्रभाव

during technical session of the conference.

Sau. Vaishali Sanjayrao Deshmukh
Secretary,
S.D.B.K.S.S. Chincholi No 2

Dr. Vijay M. Gawande
Off. Principal/Convener